## प्रकरण दुसरे

## लावणी काळाचे ओझरते दर्शन

## प्रकरण दुसरे

## लावणी काळाचे ओझरते दर्शन

शाहिरी वाङ्‌मयाचा अभ्यास करताना ज्या काळात हे शाहिरी वाङ्‌मय निर्माण झाले त्या काळाचा राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करणे जरूरीचे ठरते. कारण कोणत्याही वाङ्‌मय-प्रकारचा विकास आणि विलास हा तत्कालीन परिस्थितीवर अवलंबून असतो. ज्या काळामध्ये एखादे साहित्य निर्माण होते त्या साहित्यावर त्या काळा-तील सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थितीमध्ये निश्चित परिणाम होत असतो. या दृष्टीने लावणी हा वाङ्‌मयप्रकार ज्या काळात उगवला, उमलला त्या काळाचे ओझरते दर्शन घेणे अगत्याचे ठरते. लावणी वाङ्‌मया-वेळची महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थिती कशी होती यांचा शोध या प्रकरणामध्ये घ्यावयाचा आहे.

### उलटा सुलटा आया जमाना :

लावणी वाङ्‌मयाचा काळ म्हणजे पानिपतचा काळ. इ.स.१७६१ मध्ये पानिपतच्या लढाईमध्ये मराठयाची प्रचंड हानी झाली. विश्वासराव, सदाशिवराव, जनकोजी, इब्राहिमखान यासारखे मोहरे ठार झाले. महाराष्ट्रा-तील एक विरांची पिढी कापली गेली. महाराष्ट्रात घरोघरी हाहा:कार उडाला हजारो तरण्याताठ्या मुलीना वैधव्य आले. तोतयांचा सुळसुळाट झाला. या भीषण संहाराची बातमी ऐकून श्रीमंत नानासाहेब पेशाव्यांना धक्का बसला व त्यातच त्याचा २३ जून, १७६१ मध्ये अंत झाला. याबिकटकाळी महाराष्ट्राचे भाग्य थोर म्हणून त्याला माधवरावसारखा कर्तबगार करारी निर्भिड आणि माणसाची योग्य परीक्षा असलेला व त्यांच्याकडून कार्य करुन घेणारा कुशल नेता लाभला. पानिपतचा पराभव भरुन काढण्याच्या दृष्टीने

माधवराव पेशव्यानी आपल्या नेतृत्वाखाली मराठ्याचे सामर्थ्य वाढविले. थोड्याच कालावधीत त्यानी पानपितवरील झालेला अपमान, कलंक पार पुसून टाकला. माधवरावाची ही कारकीर्द पराक्रमाने व उज्ज्वल विजयाने उल्लेखनीय झालेली आहे. त्याचप्रमाणे चुलत्या पुतण्याच्या यादवी युध्दाने डागाळलेली आहे.

रघुनाथरावानी स्वार्थासाठी जसे स्वत:चे नुसकान केले, तसेच देशाचेही नुकसान केले. घरातील या यादवीला न जुमानता केवळ आपल्या बारा वर्षाच्या कारकीर्दीत माधवरावानी मराठ्याना पुन्हा मनाचे स्थान दिले. त्यामुळे महाराष्ट्राला पुन्हा नवीन जोम आला. घसरणाऱ्या मराठेशाहीला थोडाच काळात वैभवाच्या शिखरावर नेऊन पोहचवले. त्यामुळे अखिल हिंदुस्थानात मराठेशाहीचे नाव झाले. महाराष्ट्राच्या गादीवर आल्यापासून अवघ्या ११ वर्षानी माधवरावाचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूसंबंधी एका तत्कालीन पत्रलेखकाने म्हटले आहे "वाघ गेला। सारी कोल्ही राहिली आहेत । असे उद्गार काढले.

माधवरावाच्या मृत्यूनंतर त्यांचा भाऊ नारायण पेशवा झाला. पण त्यांच्या अंगी माधवरावसारखा पराक्रम किंवा दृष्टी नव्हती. त्याचा रघुनाथरावाच्या राज्यावर डोळा होता. त्यामुळे नारायण पेशव्याला चांगलाच संघर्ष करावा लागला. पण मुत्सद्दी व कारस्थानी रघुनाथरावामुळे १७ वर्षाच्या भाबड्या नारायणरावाचा टिकाव लागला नाही. माधवरावाच्या मृत्यूनंतर अवघ्या आठ महिन्याच्या आतच चुलत्याकडून या कोवळ्या पुतण्याचा पेशव्याच्या वाड्यात खून झाला.

नारायणरावाच्या मृत्यूनंतर लगेच रघुनाथरावाने स्वत:ला पेशवा म्हणून जाहिर केले. रघुनाथरावाने या काळात पेशवेपद प्राप्ती साजरी केली. त्याने रामशास्त्रीना न्यायाधीस पदावरून काढून टाकले.

या सर्व गोष्टीमुळे नाना फडणीस व सखाराम बापू आदि मंडळी चिडली व त्यानी बारभाईचे कारस्थान करून सवाई माधवरावाला पेशवेपदावर बसवले. त्याचा परिणाम रघुनाथरावांच्या जळफळाटात झाला व त्याने इंग्रजांना मिळून सुरतेचा तह केला. त्यामुळे इंग्रजाचा पेशव्यांच्या राजकारणात आपोआप शिरकाव झाला. इंग्रजी मराठयाच्या संभाव्य युध्दाची निशाणी ठरली. रघुनाथरावाला पेशवेपदावर बसवणे मराठे मुत्सद्यामुळे इंग्रजाना जमले नाही. हताश अवस्थेतच तो मरण पावला. त्यामुळे पेशव्याच्या यादवीवर पडदा पडला. नाना फडणीसाच्या नेतृत्वाखाली महादजी शिंदेनी उत्तर हिंदुस्थानात धडक मारली. तेथे आपले वर्चस्व प्रस्थापित करून पानिपतचा पराभवाचा कलंक पूर्ण पुसुन टाकला.

उत्तर भारतात यश मिळाल्यानंतर निजामाशी लढण्याचे ठरवले. निजामाकडे बरेच चौथाई थकलेली होती. तरीही त्याचे वर्तन उध्दटपणाचे होते. त्यामूळे निजामानेही मराठयाशी लढण्याची तयारी केली. ११ मार्च, १८७५ रोजी दोन्ही फौजात खर्डी येथे लढाई झाली. त्यात निजाम मराठयांना शरण आला व त्याने तह केला खर्डीची लढाई मराठयांच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या लढाईमुळे दक्षिण भारताततील सर्व विरोध मराठयानी नष्ट केला.

इ.स. १७९५ हे वर्ष सत्ताच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरले आहे. तसेच भविष्य काळाचाही दृष्टीने दुर्दैवी ठरले आहे. खर्ड्याच्या या लढाईनंतर अवघ्या सहा महिन्याच्या आतच माधवराव पेशवे आजारी पडले व गॅलरीतून खालच्या कारंज्यावर ते कोसळले. त्यामुळे थोडयाच दिवसात त्याचा अंत झाला. सवाई माधवरावाच्या या निधनाने अवघ्या महाराष्ट्राला दुःख झाले. अनेक शाहिरांचे पोवाडे पेशवे प्राप्तीमुळेच करूण रसाने ओथंबलेले आहेत. माधवरावाच्यानंतर पेशवेपदासाठी अनेक कट कारस्थाने ऊतु आली.

महत्वाकांक्षी नानासाहेब सर्व राजकारणाचे सुत्रधार बनले.

सवाई माधवरावांच्या मृत्यूने मराठा साम्राज्यावर अवकळा पसरली. नाना फडणीसानी आपली बुध्दीपणाला लावून साम्राज्य टिकवण्याची धडपड केली. पण पेशवेपदाच्या वारसासाठी निर्माण झालेल्या वादामुळे मराठेशाहीवरील इंग्रजाच्या दुष्ट सापटामुळे नानाच्याही कर्तृत्वाला मर्यादा पडल्या. बाजीरावाची कारकीर्द म्हणजे मराठे शाहीला लागलेले ग्रास ग्रहण ठरले. नानाचेही कारभारात लक्ष लागेना त्याचा तोल सुद्धा ढासळला. विनाशकाले विपरीत बुध्दी या न्यायाने नानाच्या सारखा मुरब्बी माणसाकडून राजकीय घटनाचे अन्वयर्थ लावण्यात घोटाळे झाले. त्यामुळे नानाचे शरीर व बुध्दी पहिल्यासारखी त्याना साथ देईनाशी झाली. आपल्याच इच्छेविरूद्ध निजामाशी गुप्तपणे तह करून बाजीरावाला पेशवेपदावर त्यानी बसवले. एवढे करूनही बाजीरावाने सत्ता हाती येताच नानानां दूर केले व महाराष्ट्रात कर्तृत्वशून्य बाजीरावाचे राज्यरोहण झाले.

मराठी साम्राज्याची उतरती कळा लक्षात येताच वाणाक्ष इंग्रजानी आपले पाश आवळण्यास सुरुवात केली. बाजीरावाला आपल्याकडे वळवण्यात त्यांना वेळ लागला नाही. बाजीराव पेशवा म्हणजे मूर्तीमंत परावलंबी जीवन त्यामुळे बाहेर इंग्रजाच्या घरात दौलतरावाच्या व सर्जेराव घाटगे यांच्या सल्याने बाजीराव राज्यकारभार करू लागला. मराठ्यानी मिळवलेली राज्यलक्ष्मी विविध विलासांच्या आहारी गेलेल्या बाजीरावांच्या कारकीर्दीत भिकारीण झाली. पैशासाठी बाजीरावाने पुण्यातील आपल्याच लोकांच्यावर अत्याचार केले. अनेक लोकांना कैद केले. या सर्व गोष्टीची चित्रणे अनेक लावण्यातून व पोवाड्यातून चित्रित केली आहेत. बाजीरावाने केलेले दुष्ट कृत्ये केलेला लोकांचा छळ, इत्यादी गोष्टी लावण्यातून व पोवाडयातून रेखाटली आहेत. त्यातील एक महत्वाची घटना म्हणजे विठोजी होळकराचा त्याने केलेला अमानुष वध.

12047

A

हे कृत्य फार बोलके व परिणामी पुण्याला घातक ठरले. विठोजीला बाजीरावाने हत्तीच्या पायी देऊन शनिवारवाड्याच्या भर चौकात ठार मारले.

बाजीरावाने शिंदे, होळकर वैमनस्य फुलत ठेवण्याची गरज नव्हती ते उलट मराठेशाहीचेच नुकसान होते. स्वत:च्या फायद्यासाठी बाजीरावाने केलेले पाप त्याच्या स्वत:च्या नाशालाच कारणीभूत ठरले. शिंदे होळकरांच्या दुफळीने मराठेशाहीचे ऐक्य संपुष्टात आले आणि विठोजीच्या वधाने यशवंतराव होळकराने पुणे शहराची व इतर भागाची होळी केली. यशवंत-रावाने पुण्याला स्मशानकळा आणून दिली. या होळकरांच्या दंग्याने सामान्य रयत हवालदिल झाली. अब्रु लुटली गेली. जवळ जवळ तीन महिने ही लुटालुट व जाळपोळ झाली.

अशा या अंधाधुंदीच्या कारभाराचे वर्णन शाहिरानी लावण्यातून चित्रित केले आहे. शाहिर परशरामानी आपल्या "आंधार नगरी बेबंद राजा" या लावणी वजा पोवाड्यात राजाच्या अंधाधुंदीचे वर्णन केले आहे.

"आंधार नगरी बाजार भरला थट चहूटयाचा ।
आला माल वंदूकडून किराणा उदमी चाटयाचा ।
हेला भरून भोपळे गेला विकाय माळी कवठयाचा ।
बसला दुकान मांडून म्हणे मी चाकर पोटाचा ।
सेव हकलाया झुंडी निघाल्या प्रथम राजाच्या ।
एक भोपळा उचलून नेला न चाले अर्जी कोणाची ।"[१]

(आंधार नगरी... पा.नं.२५४)

बाजीराव पेशव्याच्या लहरी स्वभावामुळे मराठीशाहीची ससेहोलपट कशी झाली होती. धैर्य निती या गोष्टी कशा लयाला गेल्या होत्या, पराक्रमाला ओहटी लागून भोग विलासात राजा व प्रजा कशी रंगून गेली होती,

याची कल्पना तत्कालीन लावण्यामधून शाहिरानी चित्रित केली आहे. मराठेशाहीच्या यशापयशाचे आलेख अनेक पोवाडे व लावण्यातून शाहिरानी काढले आहेत. या शाहिरी वाङ्मयातून तत्कालीन पराक्रमाची वैभवाची जशी आपणास कल्पना येते त्याचप्रमाणे बाजीराव पेशव्यामुळे निर्माण झालेली अवस्था शाहिरानी चित्रित केली आहे.

शाहिरानी आपल्या लावण्यातून असे नाश उधळपट्टी रंगविली आहे. त्याचप्रमाणे पानिपतच्या लढाई, खर्ड्याची लढाई व सवाई माधवरावांच्यावर पोवाड्यातून व लावण्यातून पराक्रमाची फुले उधळलेली पाहावयास मिळतात.

मराठी राज्याचे व अखेरच्या दिवसाचे खरे शास्त्रीनी जे वर्णन केले आहे ते "मऱ्हाटी लावणी" या ग्रंथात म.वा. धोंड यांनी प्रसिध्द केले आहे. "प्रत्येक सरदार आपल्याच लहान मोठया सरदाराशी लढण्यात गर्क झाला होता, प्रत्येकजण दुसऱ्याला लुबाडून आपले ऐश्वर्य वाढवण्याच्या उद्योगात होता. लहान लहान कारणावरून भांडणे होत होती. मराठयांच्यातील लहान लहान सरदार एकमेकाशी लढण्यात गर्क होती, शिंदे होळकरांच्या तंटयाने औचित्याची तर राहोच पण माणुसकीची मर्यादासुध्दा यापूर्वीच ओलांडली होती. मराठी राज्यात निग्रह अनुग्रहाची सत्ता कोणाच्याच हाती फारशी राहिली नाही आणि सर्व राजे बेरड, रामोशी, भिल्ल, कोळी, पेंढारी आणि बेकार शिलेदार यांच्या तंटयामुळे उध्वस्त झाले होते. त्यामुळे कोणी तरी जबरदस्त शत्रु किंवा मित्र निर्माण होऊन चहुकडे शांतता प्रस्थापित करील तर बरे असे,प्रत्येकास वाटू लागले होते."[२]

शाहिराच्या कवनामधून त्याकाळातील मराठयाच्या राजकीय परिस्थितीचे वर्णन, रामजोशी, होनाजीबाळा, प्रभाकर, परशराम

इत्यादी शाहिरानी आपल्या कवनामधून चित्रित केला आहे. शाहीर परशाराम एका लावणीमध्ये पेशवेकालीन परिस्थितीबद्दल म्हणतात -

संकट मोठे । युगांत आलास वाटे ।
आचरण खोटे । संकट मोठे ।
बुडाला धर्म हारपले नाणे । विसरले सत्कर्माचे भाणे ।
लोप देवताचे पुरले देणे । नारी दिसे उदासवाणे ।
नेत्रहिन राजे निरअभिमाने । शूर सरदार होऊन दिनवाणे ।
हत्ती उंट किविलवाणे ।
(संकट मोठे युगांत....)[3]

अशा प्रकारे सर्व शाहिरानी पेशव्याचा कारकीर्दीचे त्याच बरोबर पेशवेकालीन परिस्थितीचे चित्र रेखाटले आहे. पेशवेकालामधील राज्यांनी स्वत:ला सत्ता मिळवण्यासाठी स्वत:चे व महाराष्ट्राचे नुकसान केले आहे. स्वत:ला सत्ता मिळवण्यासाठी उलटया सुलटया क्लृप्त्या त्याकाळातील सरदार करीत होते. त्यामुळे राज्यकारभाराकडे त्याचे लक्ष नव्हते. जनता भरडली जात होती. तिच्यावर अनेक कर लादले जात होते. बाजीराव पेशव्याची अनियंत्रित राजेशाहीमुळे इंग्रजांचा अंमल सुरु झाला. त्यामुळे लावणी वाङ्मयावेळी राजकीय क्षेत्रामध्ये सर्वत्र "उलटा सुलटा आया जमाना" अशी स्थिती झाली होती.

## अंधार नगरी बेबंद राजा :

शाहिरानी जी आपली कवने रचली या कवनातून तत्कालीन परिस्थितीचे चित्र पाहावयास मिळते. आपण लावणी केव्हाची राजकीय परिस्थिती पाहत असताना बाजीरावच्या छंदीफंदी कृत्याची माहिती पाहिली. बाजीराव पेशव्यामुळे मराठी सत्तेचा अस्त झाला. इंग्रजी सत्तेचे आगमन

भारतीय राजकारणात होऊ लागले. याचवेळी समाजाच्या चालीरीती, रुढी कोणत्या होत्या हे शाहिरांच्या अनेक कवनावरून कळते. बाजीरावाच्या काळामध्ये सामाजिक चालीरिती, जातीव्यवस्था, वतने, धर्मांतरे, व्रत वैकल्य, उत्सव, सण, इत्यादी गोष्टीचा विचार केल्यास तत्कालीन समाजजीवना-विषयी आपल्याला कल्पना येते. छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळामध्ये जी सामाजिक परिस्थिती होती ती सामाजिक परिस्थिती पेशवेकालामध्ये राहिली नाही. याला कारण बाजीराव पेशव्याची राजनिती होय. बाजीराव पेशव्याच्या या कारकीर्दीबद्दल परशराम आपल्या लावणीवजा पोवाड्यात म्हणतात -

"आंधार नगरी बेबंदराजा न्याय नीती कैची ।
ठाके ठोक ठगाई करून राहिला पत त्याची ।"[४]

पेशवेकालामध्ये समाजामध्ये जाती पोटजाती दिसून येतात. या जातीमध्ये ब्राम्हणाचे वर्चस्व होते. त्याचप्रमाणे समाजामध्ये असणाऱ्या चालीरितीमध्ये विवाह, बारशे, जावळ, इत्यादी संस्कार थाटामाटात केले जात. पेशवेकालामध्ये समाजामध्ये ज्या अनिष्ट प्रथा होत्या त्यामध्ये बाल-विवाहाची अनिष्ट प्रथा, विधवाची बिकट परिस्थिती, सतीची दुष्ट पध्दती इत्यादी अनेक प्रथा पेशवेकालामध्ये समाजामध्ये होत्या. त्याचप्रमाणे गुलामीची पध्दत, स्त्रियांची वेगळी परिस्थिती ह्या सर्व घटना शाहिरांच्या लावण्यामधून पाहावयास मिळतात.

लावणीचा उगम हा मध्ययुगीन, प्राचीन काळामध्ये झाला असलातरी खऱ्या अर्थाने समाजापुढे तिचा उदय उत्तरपेशवाईत झाला. हा काळ संपूर्णतया संपन्न होता असे म्हणता येणार नाही. अनेक राजकीय बदलातून तत्कालीन जीवन हे सुखावले व दुखावले होते. अशा वेळी शाहिरानी सुखावलेल्या व दुःखावलेल्या स्थितीचे वर्णन केले आहे. राजकीय बदलाबरोबर सामाजिक

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जीवन ही बदलते या दृष्टीने समाजात जे बदल होत गेले, समाजप्रवाहात जे राजकीय रंग तरंग उमटत गेले ते लावणीने हळुवारपणे टिपले आहे. लावणीमधी आरशात जी तत्कालीन समाज जीवनाची चित्रे दिसतात त्यावरुन तत्कालीन समाजजीवनाची आपणास कल्पना येते. लावणी लोकांचे मनोरंजन करते. हाच हेतू असल्याने समाजातील उच्च लोकांचे चित्रण शाहिरानी केलेले पाहावयास मिळते.

मराठी शाहिरानी आपल्या लावण्यामधून जे सामाजिक विषय आणले त्यामध्ये सर्वसामान्य समाज अन्नासाठी दाहीदिशा वणवण फिरत होता. सर्व सामान्य लोकांची आर्थिक परिस्थिती त्याचबरोबर सांस्कृतिक धार्मिक व नैतिक पातळीच्या बाबतीत समाज खालावलेला होता. सडलेला होता. नासलेला व कुजलेला होता. हेच शाहिरानी आपल्या कवनामध्ये चित्रित केले आहे. "शाककर्ता अवतार" या पोवाडयामध्ये इंग्रजी राज्य म्हणजे या कलीयुगातील "शाककर्ता अवतार" होय या पोवाडयामध्ये ते म्हणतात,

"शाककर्ता अवतार कलीमध्ये हीच भासली नवी मुद्रा ।
जन भय निर्भय नासी कोणाशी उघडया तारी करी निद्रा ।"[5]

इंग्रजी राज्य आल्यामुळे लोक निर्भय झाले आहेत. उघडया ताटी निद्रा करण्याची अवस्था त्याला लाभली आहे. इंग्रजांचे राज्य म्हणजे तप, तेजाच्या सुर्याच्या उदय असून त्याच्या तेजापुढे पृथ्वीवरील पराक्रमहीन राजे करपून गेले आहेत. मोगले, भोसले, पेशवे याना निपटून काढले आहे. अशी अवस्था आपल्या समाजाची इंग्रजी सत्ता आल्यामुळे झाली आहे.

शाहीर परशराम यांच्या प्रमाणे शाहीर अनंतफंदीने आपल्या अनेक लावण्यातून तत्कालीन समाजजीवनाचे चित्र रेखाटले आहे. अनंतफंदी आपल्या एका "दुष्काळाच्या लावणीमध्ये" उलटया जमान्याचे चित्रण केले

आहे. हे कलियुग असे उफराटे आलेले आहे. माणसाची फसवा फसवी, कुटाकुट चाललेली आहे. नातीगोती लयाला गेली आहेत. ख-या खोटयाला समाजामध्ये स्थान नव्हते. दुष्काळाने धरणी पिकेना, दुधाला कोणी विकेना आचारधर्म टिकेना, विद्येला कोणी पुसेना, पराक्रम कोठे दिसेना अशी समाजाची अवस्था झाली होती. जार कर्माला उधाण आले होते. न्यायनीती लयाला गेली होती. असे विविध प्रकारे अत्याचार, अनाचार माजलेला होता. या सर्व गोष्टीचे वर्णन शाहिरानी लावण्यातून व पोवाडयातून केले आहे.

शाहिरानी लोकांचे जीवन दुष्काळ जुलुम जबरदस्ती दारिद्र्य इत्यादी गोष्टीचे चित्रण शाहिरानीथोड्या प्रमाणात केले आहे. उलट श्रीमंत सरदाराचे विलासी वैभवसंपन्न जीवन रंगविण्यात त्यानी आपली प्रतिभा खर्च केली. शाहिरानी हिरव्या गादीवर प्रियकराची प्रतिक्षा करीत लोळणा-या विलासनीची कवने जास्तप्रमाणात चित्रित केली आहेत. उन्हा,पावसात धाधगणा-या, गारठणा-या व अपार कष्ट करणा-या शेतक-याची कामक-याची चित्रे लावणीत तुरळकच दिसतील. शाहिरानी रणांगणावर जाणारा आठ महिने स्वारीवर फिरणारा चार महिन्यासाठी विश्रांतीला गावावर नव्हे तर नगरात येणारा शिपाईसुद्धी त्यांनी रंगविला आहे. शाहिरानी ग्रामीण भागाकडे लक्ष कमी दिले आहे. पण नागर जीवनाकडे त्यानी पुर्णपणे लक्ष दिलेले पाहावयास मिळते. जेथे सावकार, गब्बर होते, धनवंतराच्या भल्या, भल्या वाडे, हवेल्या होत्या त्या वाडे हवेल्यात शाहिर रंगलेले आहेत.

स्त्रियांच्या विविध भावना शाहिरानी कवनातून चित्रित केल्या आहेत. लावणीच्यावेळी स्त्रिकडे पाहण्याची जी समाजाची रीत होती त्याची वर्णने होनाजीबाळा यानी आपल्या एका लावणीत रेखाटली आहेत. स्त्री सौंदर्याचे रंग, रुप, नाद, गती याने वेध घेणारी ही साधने मराठी शाहिरी काव्यातील प्रभाकर, होनाजीबाळा, रामजोशी, सगनभाऊ इत्यादी अनेक शाहिरानी

आपल्या प्रतिभा संपन्न वाणीने स्त्री सौंदर्याची वर्णने केली आहेत. त्यापैकी परशरामाने आपल्या "टुमदार कोणाची छान । नवती भरज्वान" या लावणीत एका नव युवतीचे चित्र रेखाटले आहे.

"टुमदार कोणाची छान । नवती भरज्वान पुसारे आली कुठून
स्वरूपाचे तुटतील तारे कठारे कड विजवा पडतील लुटून ।" [६]

समाजामध्ये त्यावेळी बहुपत्नित्वाची चाल होती. पुरुष स्त्रिकडे शोभेचा अलंकार म्हणून पाहत होता. या स्त्रियांच्यावापर कोणत्याही अनिष्ट कामासाठी केला जात होता. पेशवेकालामध्ये स्त्रिचे जीवन धोक्यात आले होते. त्यामुळे स्त्री सतत निराशामय असे. अशा स्त्रिचे वर्णन देशमुख बी.बी. आपल्या ग्रंथात करतात.

"संपूर्ण स्त्री जीवनाचे अस्तित्व धोक्यात आले होते. त्यामुळे स्त्रीचे जीवन संगून आणि काळंबून गेले होते. स्त्री अगदी गोगलगाय व एका अर्थाने दलित, पतित आणि व्यथित झालेली होती. तिची स्थिती शोचनीय आणि दयनीय झालेली होती." [७]

त्या काळामध्ये स्त्रिची वरील अवस्था शाहिरानी आपल्या अनेक लावण्यातून रेखाटली आहे. त्याचबरोबर अशी दयनीय अवस्था झालेली स्त्री कधी कधी पेटून उठते व आपल्या प्रियकराच्या, पतीला दुषणे देते. पती दूर गेलातर तिला मरणप्राय यातना होतात. त्याचबरोबर शाहिरानी सवती सवतीची भांडणे, निपुत्रीक स्त्रीची दुःखे, पुत्रप्राप्तीचा आनंद, पुत्रासाठी, देवदेवताना नवस, मंत्रतंत्र, जादुटोणा यांचेही वर्णन अनेक लावण्यातून शाहिरानी रेखाटले आहे. अशा स्त्रिच्या विविध भावना शाहिरानी आपल्या लावण्यात चित्रित केल्या आहेत.

शाहिर आपल्या लावण्यामध्ये अतीव सुंदर कांतिमान, लडिवाळ, देखणी, अशी सुंदर स्त्री रेखाटतात. या सुंदर स्त्रीच्या अलंकाराचे, वस्त्र

इत्यादी गोष्टीचे चित्रण लावण्यातून करतात. लहिवाळ स्त्री हिरवा, पैठणी, हिरवी चोळी, हिरवा दुपेटा, वेणीत व गळयात पाचुचा हार, तमपोडी, बबंहरी, बावडी, मस्तकी, गुदराखडी, हातीचुके, हाळाळी, वावडया, गळयात गळसरी हुशी, पायी घोळ रूमदुमती साखळया, तुरेदार नथ, चिंचपाने बागडया, पाची पोहहारे, त्याचबरोबर स्त्रियांच्या पोशाखात काळी चंद्रकळा, चुनखडी, महेश्वरी पातळ, उडी शाल, तंग काचोळी, आयने बसवलेली काचोळी, रेशमी सोनसळा, रंग पिवळी साडी, अशी विविधता तत्कालीन स्त्रियांमध्ये दिसते.

स्त्री चित्राच्या मानाने पुरूषाची चित्रे कमी आहेत. शिपाईगडी, मुसाफिर, पतिव्रतेचा नवरा, पत्नीसाठी सती जाण्याची भाषा बोलणारा पुरूष, कामधंदा न करता ऐतखाऊ असलेला नवरा, दोन बायकांच्या भांडणाने कावलेला नवरा असे अनेक पुरुष शाहिरानी आपल्या कवनामध्ये रेखाटले आहेत.

शाहिरानी स्त्रियांच्या ज्या विविध छटा आपल्या लावणीमध्ये रेखाटल्या आहेत त्याला कारण "बाजीराव पेशवा" असा राजा तशी प्रजा" या म्हणीनुसार राजाप्रमाणे प्रजाही वागत होती. शाहिरानी आपल्या आर्थिक हव्यासापोटी मोठ मोठया सरदाराच्या समोर कामातूर स्त्रियांची, वयात आलेल्या, तरूणीची चित्रे रेखाटली आहेत. त्यामुळे सरदार आनंदीत होऊन शाहिराची आर्थिक हव्यास पुरी करीत होते. बाजीराव पेशव्याचे उदाहरण जर आपण घेतले तर सतत स्त्रियांच्या घोळक्यात गर्क असणारा अभियंत्रीत राजा होता. बाजीराव पेशव्याला रंगेलपणात जो साथ करील त्यास दरबारात स्थान होते. इतराना दरबारात स्थान दिले जात नव्हते. बाजीरावच्या वाडयात दोन तिनशे बायका सतत असत. न्हान घालण्यासाठी पंक्ती, भोजनासाठी जवळ बायका बसलेल्या असायच्या. बाजीरावच्या दरबारी जे लोक होते त्यानी पाच पाच लग्ने करावी एक बायको घरी ठेवून

इतर बायका बाजीरावाच्या दरबारी पाठवाव्या लागत. यामध्ये काही सरदार तयार झाले. पण काही तयार नव्हते त्याना पुणे सोडावे लागले.

स्त्रियांच्या हाती सर्व कारभार होता. स्त्रिया नव-यावर हुकुम गाजवित होत्या असे चित्र त्या काळातील होते. पेशवे काळामध्ये बाजीराव पेशव्याच्या वाडयात दोन तिनशे उनाड बायकांचा थवा वाडयात भरलेला असे अशा कृष्णावतारी बाजीराव पेशव्यामुळे समाजामध्ये सर्व सामान्य लोकांची परिस्थिती बिकट झाली होती. कधी शस्त्र हाती न धरलेला राजा त्याना नको होता. कारण या राजाची अनियंत्रित उधळपट्टीमुळे सर्वसामान्य लोकांच्यावर वेगवेगळ्या पध्दतीने कर बसविले जात होते. सर्वसामान्य जनता हैराण झाली होती. अशा या अंधाधुंदीच्या किंवा अनियंत्रित राजेशाहीमुळे मराठी सत्तेचा अस्त झालेला पाहावयास मिळतो.

ज्याप्रमाणे राजेरजवाडयाच्या महालातील परिस्थिती झाली होती तीच परिस्थिती सर्वसामान्य स्त्रीयांची झाली होती. स्त्रियांच्या विविध अवस्था सर्व शाहिरानी आपल्या लावण्यातून चित्रित केल्या आहेत. त्याचबरोबर समाजामध्ये विधवाना दिली जाणारी वागणूक त्यांची अवस्था वेगवेगळया पध्दतीनी शाहिरानी चित्रित केली आहे.

अशा पध्दतीने या पेशव्याच्या अंधार नगरीमध्ये सर्वसामान्य लोकांना न्याय मिळत नव्हता. प्रत्येक जण आपल्या मनाप्रमाणे वागत होता. सामान्य जनता भरडली जात होती. स्त्रियांची अवस्था वेळीच होती. अशी भयानक परिस्थिती लावणीच्या कालामध्ये निर्माण झाली होती. याला कारण बाजीराव पेशवा होय.

प्राचीन काळापासून समाजामध्ये चालत आलेल्या परंपरा रुढी, अनिष्ट प्रथा यानी समाज ग्रासलेला होता. यामुळे समाजाची प्रगती होत नव्हती.

समाजामध्ये वापरले जाणारे पोशाख, अलंकार इत्यादी गोष्टींचे चित्रण शाहिरानी आपल्या लावण्यातून केले आहे. त्यामुळे त्याकाळातील सामाजिक परिस्थितीची माहिती मिळते.

अशा पध्दतीने मराठी साहित्यामधील या शाहिरांच्या कवनामधून महाराष्ट्रातील तत्कालीन चालीरीती, रूढी, परंपरा, स्त्रियांच्या विविध त-हा, बाजीराव पेशव्याची कामतूरता इत्यादी अनेक गोष्टींचे चित्रण आपल्या लावण्यामधून शाहिरानी केले आहे.

बुडाला धर्म । हरपले नाणे :

लावणी वाड्.मयावेळच्या राजकीय, सामाजिक, परिस्थितीतून त्याकाळातील राजेरजवाडयाचे व सर्वसामान्य जनतेच्या वागणुकीचे चित्रण पाहावयास मिळते. राजेरजवाडयानी सत्तेसाठी केलेले राजकारण त्यामध्ये मराठयात झालेला संघर्ष व इंग्रजी लोकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश केला त्याचबरोबर त्याकाळातील समाजामध्ये असणा-या अनिष्ट प्रथा, अंधश्रध्दा, स्त्रियांची परिस्थिती विलासी बाजीराव पेशवा या सर्व घटनाचे चित्रण शाहिरानी आपल्या लावण्यामधून केले आहे. लावणीच्या वेळी धार्मिक परिस्थिती कशी होती यांची माहिती घ्यावयाची आहे.

पेशवेकालामध्ये समाजावर ब्राह्मणाचे वर्चस्व असलेले पाहावयास मिळते. सर्व मोक्लया जागी ब्राह्मण लोकांची वर्णी लागलेली होती. छत्रपती शिवाजी महाराजापेक्षा वेगळेपणा दाखवणारा कारभार पेशव्याचा होता. त्यावेळी ब्राह्मणांचा जास्तीत जास्त भरणा सेनापतीपदावर होता. लष्करामध्ये ब्राह्मणांचा भरणा जास्त होता. प्रभू शेणवी इत्यादी पांढरपेशा ब्राह्मणांचा दरबारात टिकाव लागेना झाला. समाजातील सगळयाच वर्गात असुरक्षिततेचा अभाव दिसू लागला. छत्रपती शिवाजी व शाहू महाराजाच्या

कालामध्ये समाजातील अनेक वर्गामध्ये जी एकता होती ती बाजीराव पेशव्याच्या काळात नाहीसी झालेली पाहावयास मिळते.

बाजीराव पेशव्यानी ब्राम्हणांच्या म्हणण्यानुसार कारभार केला. पेशवाईतल्या ब्राम्हणांना वाटत होते की, आपणच खरे राजे आहोत । ब्राम्हणांना स्वतं:च सवलती भोगावयास मिळू लागल्या. त्याना कायद्याची बंधने शिथील करण्यात आली. पेशव्याच्या दरबारातील कोकणस्थ कारकून स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत होते. त्याना अनेक फायदे मिळत होते. त्यांच्या मालावर आयात निर्यातीच्या बाबतीत जकात माफ होती. शेतीच्या पिकावरील सारा पेशव्यानी कमी ठेवला होता. शिक्षा व दंड कमी केला जात असे. ब्राम्हणांना उदार वागणूक मिळत असे. बाजीराव पेशव्यानी ब्राम्हणांना सढळ हाताने दिलेल्या देणग्या किंवा दक्षिणा यांचे चित्र लावण्यामधून शाहिरानी चित्रित केले आहे. बाजीराव पेशव्यानी ब्राम्हणांना जी मदत केली ती श्रावण महिन्यामध्ये केली आहे. बाजीरावाने ज्या दक्षिणा दिलेल्या त्याचे दाखले ऐतिहासिक कागदपत्रातून सापडतात.

शाहीर परशरामानी पुण्यामध्ये जे ब्राम्हणांचे वर्चस्व होते त्याचे वर्णन "संकट मोठे युगांत आलास वाटे" या पोवाडयात पुण्यातील ब्राम्हणांचे वर्णन केले आहे -

चार लक्ष बावीस हजार कली । त्यांत कमी सख्या गत झाली ।
पुढील होय की आतांच आली । ब्राम्हण अवध्यांची गुरुकिल्ली ।
जे का वरीष्ठ वेदवल्ली । त्यांचे मन बहाली ।
तिच्यापुढे काय लग्नाची आली । वेदवंशी लेकरे झाली ।
त्यांचा आचार याहुनि ढोली । जसे काय आभाळी गगनी खवली ।
बुढाल्या कुलांगनांच्या भेली । पतीला करुन ठेविली बिल्ली ।
संकट मोठे युगात आलास वाटे...[6]

बाजीराव पेशव्याच्या काळात ब्राम्हणाकरिता दक्षिणा व जेवण याची भरपूर तरतूद सरकारने केली होती. तीस ते चाळीस हजार ब्राम्हण ओळीने कित्येक दिवस पक्वानांची भोजने होत होती. यामुळे पुणे शहर ब्राम्हण भिकाराचे जंगी केंद्रच बनले होते. समाजात सर्वत्र ब्राम्हणांचे वर्चस्व होते.

पुणे ही पेशव्यांची राजधानी या पुण्यामध्ये सर्वत्र ब्राम्हणाच दिसतात प्रत्येकवर्षी या ब्राम्हणामध्ये वाढ झालेली होती. पेशव्यांनी आपल्या हातानी दोनशे, चारशे, चवदाशे, दोन हजार पर्यंत दक्षिणा दिलेली पाहावयास मिळते. दक्षिणा देण्यासाठी बाजीरावाने पाच ते सात दरवाजे खुले केले होते. श्रीमंतानी दक्षिणा देताना वस्तूच्या रुपाने दक्षिणा दिलेल्या पाहावयास मिळतात. त्यामध्ये मोहरा, पुतळया, रुपये, मोती, इत्यादी गोष्टी दान केलेल्या होत्या. पुण्याला "दुसरी काशी" म्हणून लोक ओळखू लागले व तशी पुण्याची किर्ती पसरली. बाजीराव पेशव्याच्या दानधर्माचा परिणाम समाजातील सर्व सामान्य जनतेवर झाला होता. सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नाकडे किंवा समस्याकडे बाजीरावाचे लक्ष नव्हते. त्यामुळे बाजीराव पेशव्यांच्यावर रयत नाराज होती. हे दान जास्त प्रमाणात वाटू लागल्यानंतर सर्वसामान्य लोकांच्याकडून कर जास्त प्रमाणात घेतला जाऊ लागला. हा कर विविध गोष्टीवर बसवून विविध गोष्टीच्या माध्यमातून घेतला जात होता. त्यामुळे बाजीराव पेशव्याच्या अनियंत्रीत राजेशाहीचा शेवट झाला हा शेवट होण्यास बाजीराव पेशव्याने ब्राम्हणांना दिलेल्या सवलती दिलेले दान, या सर्व गोष्टीमुळे बाजीरावचा व मराठी सत्तेचा शेवट झाला.

"म-हाटी लावणी" या आपल्या ग्रंथात म.वा. धोंड म्हणतात - "बाजीराव पेशव्याची धार्मिकता होती ती केवळ दिखावू स्वरुपाची होती. कारण पेशवाईत राज्यलोभाने व द्रव्य लोभाने जे खून झाले, गाईची हत्या

झाली ब्राम्हण स्त्रियांची बेअब्रू झाली." [१] या सर्व गोष्टीवरून म.वा. धोंड यांच्या म्हणण्यात आपल्याला सत्यता येते. कारण पैशाच्या लोभाने सत्तेच्या लोभाने वरील सर्व गोष्टी पुण्यामध्ये घडत होत्या त्यामुळे बाजीराव पेशव्याना फसवून द्रव्य व आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न ब्राम्हण करीत होते.

याच काळामध्ये महाराष्ट्रातील संतानी शिकवलेला भागवत धर्म लोक विसरत चालले होते. आणि वैदिक यज्ञयाग, वर्णभेद, व्रते, उद्यापने, यातच गुंतत चालले होते. यातूनच पुढे ब्राम्हणांच्यात संघर्ष चालू झालेला पाहावयास मिळतो. उदा. ब्राम्हण-प्रभू, सारस्वत-ब्राम्हणवाद, कोकणस्थ-क-हाडे वाद, कायस्थे-क-हाडे वाद इत्यादी वाद उद्‌भवले होते आणि जातीजातीमध्ये वैमनस्य माजले होते.

धर्माच्या शिकवणीकडे दुर्लक्ष होऊन यज्ञयाग, व्रते उद्यापने इत्यादी कर्मकांडातच मनुष्य गुंतत चालला की त्याच्या मागोमाग शकून, मुहूर्त, नवस, गा-हाणी, अंगारे, धुपारे, गंडेदोरे, देवदेवर्षी, जारण-मारण इत्यादी गोष्टी सहजच येतात. पेशवेकालातील पेशवेच अंधश्रध्दा पाळत होते. त्यामध्ये माधवराव पेशवे स्नानसंध्या, जपजाप, पुजाअर्चा इत्यादी गोष्टीमुळे राज्य-कारभाराकडे दुर्लक्ष होते असलेले पाहून रामशास्त्राने क्षात्रधर्माची जाणीव देऊन माधवराव पेशव्यास मार्गावर आणले. पेशवेकाळातील सर्व राजे महत्त्वाच्या भेटी लढाई तह वगैरे गोष्टी ते मुहूर्त पाहून करीत असे. इत्यादी अनेक लोकभ्रमाचे प्रकार पेशवेकालीन राजाच्यामध्ये होते, तेच समाजामध्ये आढळत होते.

पेशवेकाळातील राजे-रजवाडे ही अंधश्रध्दा पाळत होते. भोजन दक्षिणा वाटत होते. त्याचा परिणाम रयतेवर झालेला होता. रयतेवर ही अंधश्रध्देचा पगडा पडलेला होता. समाजामध्ये सर्वत्र अंधश्रध्दा बोकाळली होती. बाजीराव पेशव्याला शेवटी पळून जावे लागले. त्याने इंग्रजाशी सहमत

करून स्वत:चे व मराठेशाहीचे नुकसान केले. इंग्रजांनी महाराष्ट्रामध्ये पाय रोवण्यास सुरुवात केली.

.....